सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे
दूरध्वनी क्र :.०२०.२५५५९२०० ,२५६७६८१८- संकेतस्थळ: www.gppune.ac.in ईमेल-: principal@gppune.ac..in

जा.क्र. शातंनिपु /CDC _MEES /२०२४/3172 दिनांक:१८ /०७/२०२४

परिपत्रक महत्वाचे

विषय:- अभियांत्रिकी पदविका (१२०-NEP) अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष उत्तीर्ण केलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम सोडण्याच्या (Exit) कार्यप्रणाली पर्यायाबाबत.

संधर्भ : जा.क्र.मरातशीम/का -५० /Exit option /२०२४/४०५१ दिनांक ११ जुलै २०२४

उपरोक्त परिपत्रकान्व्ये Multiple Entry and Exit (MEES) बाबत सर्व विभाग प्रमुखांना व समन्वयक याना कळविण्यात येते कि संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षानंतर Exit करावयाचे झाल्यास प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन ४० क्रेडिट प्राप्त करणे व ०८ आठवडयांचे internship पूर्ण करणे अनिवार्य आहे.या योजनेचा लाभ घेण्यास पात्र विद्यार्थ्यांनी व संबधीत विभाग प्रमुखांनी करावयाच्या कार्यवाहीची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अ) विद्यार्थ्यांची अर्ज स्वीकृती व नोंदणी:-

१) सदर संधीचा लाभ घेण्याकरिता प्रथम वर्ष (१२०-NEP) उत्तीर्ण असलेल्या पात्र विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम निहाय यादी विभाग प्रमुख यांच्या MIS login "१२०-NEP Exit option" या लिंक अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) सदर संधीचा लाभ घेण्याकरिता प्रथम वर्ष (१२०-NEP) उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या MIS login "१२०-NEP First Year Exit option" ही लिंक अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) इच्छुक विद्यार्थ्यांनी "१२०-NEP First Year Exit option" या लिंकला क्लिक करून या योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करावी. तसेच रु. १०००/- शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरून , या लिंक द्वारे उपलब्ध करून दिलेला अर्ज (Progorma-१) भरून सोबत प्रथम व द्वितीय सत्राच्या गुणपत्रिकेच्या प्रतीसह विभागात विहित वेळेत सादर करावा. विभागाने अर्ज स्वीकारुन विद्यार्थ्यांची नोंदणी निश्चित करावी.

ब) विभागानी Exit पर्यायासाठी निश्चित (confirm) केलेल्या विद्यार्थ्यांच्या ०८ आठवडयांच्या आंतरतासिका (Internship) बाबत करावयाची कार्यवाही पुढीलप्रमाणे:-

१) संबंधीत विभागाद्वारे सर्व नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे आठ आठवड्यांच्या कालावधीचे निश्चित केलेल्या कौशल्य विकास विषयानिगडित औद्योगिक प्रशिक्षण (इंटर्नशिप) संस्थेच्या प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी (Training and Placement officer) यांच्या मदतीने ठरविलेल्या औद्योगिक संस्थेत पूर्ण करून घ्यावे.

२) औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण केल्याची माहिती विभाग प्रमुख यांच्या MIS login मध्ये असलेल्या "Industrial Training Certificate" या लिंक द्वारे उपलब्ध Internship Certificate (Proforma २) मध्ये माहिती भरून निश्चित करावी.

३) औद्योगिक प्रशिक्षणाबाबतची माहिती निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांचे गुणमूल्यांकन करून गुण भरण्यासाठी FA-PR आणि SA-PR च्या e-गुणपत्रिका विभाग प्रमुखांच्या लॉगिनमध्ये "Exit Option E-Marksheet" या लिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. संस्थेच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार गुणपत्रिकेत गुण भरून निश्चित करावेत.

४) E-Marksheet निश्चित केल्यानंतर विधार्थ्यांचे "Certificate of Vocation" विभाग प्रमुखांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. विभागाने सदर प्रमाणपत्राची प्रिंट घेऊन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्र हेच अंतिम "Certificate of Vocation" प्रमाणपत्र असेल.

महत्त्वाच्या सुचना:-

१) Multiple Entry and Exit Scheme (MEES) या संधीचा लाभ घेऊन तात्पुरत्या स्वरूपात संस्था सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्था सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) देण्यात येणार नाही. परंतु ज्या विद्यार्थ्यांना सदर संधीचा लाभ घेऊन संस्था कायमची सोडायची असेल अशा विद्यार्थ्यांना संस्था सोडल्याचा दाखला (Leaving certificate) देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांचा संस्थेतील प्रवेश अबाधित न राहता सदर प्रवेशावर पुनश्च उर्वरित पदविका अभ्यासक्रम पूर्ण करू शकणार नाही याची नोंद घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांनी एक्सिट चा पर्याय निवडला आहे, अशा विद्यार्थ्यांचे पुढील परीक्षेपासून परीक्षा अर्ज संस्थेच्या परीक्षा विभाग कडून थोपविण्यात येतील.

३) Multiple Entry and Exit Scheme (MEES) योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात संस्था सोडण्याचा विकल्प निवडताना संबंधित विद्यार्थ्याला शिक्षण घेत असलेल्या शाखेतील पदविका प्राप्त करण्यासाठी उत्तीर्ण होणे आवश्यक असलेली उर्वरित अभ्यासक्रमाची वर्षे पूर्ण करण्यासाठी ४ शैक्षणिक वर्षांच्या आत फक्त शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला पुन्हा संस्थेत रुजू होणे आवश्यक आहे. हा ४ शैक्षणिक वर्षांचा कालावधी हा ज्या शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस विद्यार्थ्याने Multiple Entry and Exit Scheme (MEES) योजने अंतर्गत लाभ घेण्यासाठी संस्था तात्पुरत्या स्वरूपात सोडली असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

४) अशाप्रकारे Multiple Entry and Exit Scheme (MEES) योजनेचा लाभ घेताना संबंधित प्रथम वर्ष डिप्लोमा प्रवेश विद्यार्थ्याला त्याच्या मूळ प्रवेशाच्या दिनांकापासून कमाल ७ वर्षांच्या कालावधीत अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील आवश्यकत्या सर्व सत्रांचे सत्रकर्म पूर्ण करणे बंधनकारक असेल. या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्याला संपूर्ण पदविका अभ्यासक्रमातील आवश्यकत्या सर्व सत्रांचे सत्रकर्म पूर्ण करण्यास ७ वर्षापेक्षा जास्त कालावधी लागत असल्यास, अश्या विद्यार्थ्यांचा संस्थेमधील प्रवेश रद्ध करण्यात येईल व तो विद्यार्थी पदविका प्रमाणपत्र मिळण्यास अपात्र ठरेल.

५) Multiple Entry and Exit Scheme (MEES) बाबतचे विद्यार्थ्यांचे अर्ज व हमीपत्र (Proforma-I), Internship Certificate (Proforma-II), गुणमुल्यांकनाबाबतचे तसेच प्रदान करण्यात आलेल्या "Certificate of vocation" बाबतचे सर्व दस्ताऐवज जतन करण्याची तसेच अकॅडेमिक मॉनिटरिंगच्या वेळेस समिती समोर सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभाग प्रमुखांची राहील.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताचे Exit पर्याय प्रक्रिये बाबतचे सविस्तर वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित व प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांना Multiple Entry and Exit Scheme (MEES) या योजनेची माहिति देऊन विभागानी विहित नमुन्यातील अर्ज व हमीपत्र व रु. १०००/- शुल्का भरल्याचे निश्चित करून विद्यार्थ्यांचा अर्ज स्वीकारून विद्यार्थ्यांची नोंदणी निश्चित करणे | १८-०७-२०२४ ते २३-०७-२०२४ |
| २. | विभागानी निश्चित केलेल्या विद्यार्थ्याचे औधोगिक प्रशिक्षण पूर्ण करून इंटरेन्शिप सर्टिफिकेट विभाग प्रमुखांच्या MIS login मधून अपलोड करणे | ३०-०७-२०२४ ते २४-०९-२०२४ |
| ३. | विभागानी विद्यार्थ्यांचे गुणामुल्यांकन करून FA -PR व SA -PR चे गुण e -मार्कशीट मध्ये भरून गुणपत्रिका कन्फर्म करणे . | २४-०९-२०२४ ते ३०-०९-२०२४ |
| ४. | "Certificate of Vocation" विभाग प्रमुखांच्या Login मध्ये उपलब्ध करून देण्याचा कालावधी | ३०-०९-२०२४ ते ०५-१०-२०२४ |

डॉ. राजेंद्र का.पाटील
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन ,पुणे

प्रत:

सर्व विभाग प्रमुख ,MIS समन्व्यक व परीक्षा नियंत्रक याना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

# PROFORMA-I

## प्रथम वर्ष अंती Exit करीता विध्यार्थाचा अर्ज व हमी पत्र

मी,______________________________Enrollment No.____________

Diploma in ____________________________________________ या अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण केले असून हा अभ्यासक्रम तात्पुरता/नेहमी करता सोडू इच्छितो किंवा इच्छिते,कारण

____________________________________________________________________________

____________________________________________________________________________

मी याबाबत हमी देतो/ देते की ,मला याबाबत संस्था/ विभागप्रमुखांकडून पुढील प्रमाणे सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

१) सदर अभ्यासक्रम अभ्यासक्रम कायमस्वरूपी सोडून जात असल्यासच मला संस्थेकडून सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) देण्यात येईल.

२) मी सदर अभ्यासक्रम तात्पुरता सोडून इच्छित असलो / असले तर मी सदर अभ्यासक्रमात सोडून जात असल्यापासून चार वर्षाच्या आत फक्त शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीसच पुनश्च प्रवेश घेऊ शकेल तसेच संस्थेत पुनश्च प्रवेश घेताना, विद्यार्थ्यांना पुनश्च प्रवेशाच्या वेळी लागू असलेल्या अभ्यासक्रमाच्या संबंधित विषयांची व Multiple Entry and Exit Scheme (MEES) योजनेअंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात संस्था सोडण्याचा विकल्प निवडताना लागू असलेल्या अभ्यासक्रमाच्या विषयांची समकक्षता पडताळून आवश्यक त्या विषयांची नोंदणी करावी लागेल.

३) अशाप्रकारे Multiple Entry and Exit Scheme (MEES) योजनेचा लाभ घेताना मला मूळ प्रवेशाच्या दिनांकापासून कमाल ७ वर्षाच्या कालावधीत अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील आवश्यकत्या सर्व सत्रांचे सत्रकर्म पूर्ण करणे बंधनकारक असेल. सर्व सत्रांचे सत्रकर्म पूर्ण करण्यास ७ वर्षापेक्षा जास्त कालावधी लागत असल्यास, माझा संस्थेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल व मी पदविका प्रमाणपत्र मिळण्यास अपात्र ठरेल.

४) First Year Exit Scheme नुसार, जर मी प्रथम वर्ष उत्तीर्ण केले असून, किमान आठ आठवड्यांची इंटर्नशिप पूर्ण करून त्यासंबंधी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतरच मला व्यवसाय प्रमाणपत्र (Vocational Certificate) प्रदान केले जाईल.

५) First Year Exit Scheme योजनेचा लाभ घेऊन मी त्याच वर्षाच्या लगतच्या पुढील सत्राच्या / शैक्षणिक वर्षात मला प्रवेश घेता येणार नाही याची जाणीव करून देण्यात आली आहे.

दिनांक | विद्यार्थ्यांचे नाव व स्वाक्षरी

---

पालकांची सहमती.

माझ्या पाल्याचा अभ्यासक्रम सोडून सोडण्याच्या निर्णयाशीवरील माहितीशी मी पूर्णपणे सहमत आहे.

पालकांचे नाव व स्वाक्षरी दिनांक.

---

विभाग प्रमुखाचे हमी पत्र

वरील विद्यार्थी अभ्यासक्रम सोडू इच्छित असल्याने त्या बाबतीतील नियमांची संपूर्ण कल्पना त्यास देण्यात आले असून त्याच्या विनंतीनुसार प्रथम वर्ष Exit करता शिफारस करण्यात येत आहे.

विभाग प्रमुखाचे नाव व स्वाक्षरी दिनांक.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे
दूरध्वनी क्र :.०२०.२५५५९२०० ,२५६७६८१८- संकेतस्थळ: www.gppune.ac.in ईमेल-: principal@gppune.ac..in

# Certificate of Completion of Exit Internship-I

This is to certify that Mr./Ms. ______________________________ with Enrollment No. _________________ has successfully completed an Internship/Industrial Training in the field of _____________________________________ from _________________ to _________________. This internship was undertaken as a requirement for the completion of the Exit Internship after the first year of the Diploma in _______________________ from the Government Polytechnic, Pune.

Date:

Signature
Head of Department